**नि. फौ. खटला क्र.५५/२०१९**

**निशाणी क्र.१००**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०२ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

**माझे नांव** : शरद दादाराव पाटील,

**वय** : ५१ वर्षे, **धंदा** : कनिष्ठ सहायक, पंचायत समिती, देवणी.

**राहणार** : निटुरबी, ता. भालकी, जि. बिदर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

दि.२१/०९/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजताच्या दरम्यान पोलीस ठाण्यामध्ये बोलावले होते. मी पोलीस ठाण्यामध्ये गेलो. तेथे आरोपी गंगाधर कोंपले होता. त्याने गुन्ह्यात वापरलेली काठी शेतातील गोठ्यात लपवून ठेवलेली आहे, तुम्हाला दाखवतो असे सांगितले होते. पोलिसांनी त्याबाबत पंचनामा केला होता. आता मला निवेदन पंचनामा दाखविला. हा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यावर आरोपी गंगाधरच्या अंगठ्याचे निशाण आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. (सदर पंचनाम्यातील कबुली जबाब वगळता फक्त शोध मजकूरास **निशाणी १०१** देण्यात येते.

०२. मी पोलीस वाहनाने आरोपी गंगाधरच्या शेतात गेलो. आरोपी गंगाधरने शेतातील गोठ्यात पाईपाच्या खाली ठेवलेली काठी दाखवली. पोलिसांनी सदर काठीबाबत पंचनामा केला आणि माझ्या सह्या घेतल्या. आता मला पंचनामा दाखविला. हा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी १०२** देण्यात येते. आता मला मुद्देमाल क्र.३८/२०२५ मधील सिलबंद कापडी पिशवीतील काठी दाखविली. (सदर काठी सडलेल्या स्थितीत आणि एकुण ३ तुकड्यामध्ये आहे.) ही तीच आहे. त्यावर लवलेल्या कागदी चिठ्ठीवर माझी सही आहे. सदर काठी आणि कागदी चिठठी यांना **वस्तूचिन्ह ४** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**:: मध्यान्नाची वेळ झाल्यामुळे उलटतपास मध्यान्नापर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.
दि.०३/०१/२०२६.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

**:: मध्यान्नानंतर साक्षीदाराचा वारंवार पुकारा केला असता तो ४.०० वाजेपर्यंत गैरहजर आहे. सबब उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब. ::**

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.
दि.०३/०१/२०२६.